*कथा क्रमांक १२*

# The Unexpected Proposal

संध्याकाळची वेळ - पावसाची रिपरिप संपून आता चांगलाच कोसळू लागला होता - हातातल्या पिशव्या सांभाळत तिने चावीने घराचं दार उघडलं आणि ... धडधडत्या हृदयानं घरात पाऊल टाकलं. जड पिशव्यांचा भार तिच्या डोक्यातल्या विचारांच्या मानाने काहीच नव्हता. आल्या आल्या तिची नजर समोरच्या कॉफीटेबलकडे गेली. मोठ्ठा गुलाबाचा गुच्छ, एक लाल मखमली बंद डबी आणि एक गुलाबी लिफाफा.....! तिची नजर तिथेच स्थिरावली. पायात एकदम गोळेच आले. आणि हृदयातले ठोके आता चांगलेच ऐकू यायला लागले. बाहेरचा पाऊस आता अगदी डोळ्यात दाटून आला होता. पिशव्या हातातून गळून पडल्या... काय सांडलं काय राहिलं याचं भान राहिलं नाही तिला. घाईघाईने तिने लिफाफा उघडला आणि पुन्हा पटकन् न वाचताच ठेऊन दिला. मग ती लाल मखमली डबी उघडली आणि दुसऱ्या हाताने गुलाबांचा सुगंध नाकात, मनात साठवला. डबीतल्या गोष्टीवर तिची नजर खिळली...एक आनंदाची अस्फुट हाक तिने स्वतः लाच मारली...हिऱ्याच्या कानातल्यांकडे ती विस्फारून बघत बसली. तिच्या मनात विचार आला, " खरंच एवढं प्रेम करतो हा आपल्यावर. की हा सगळा देखावाच? खरं काय खोटं काय? काही थांग लागत नाही ह्याच्या मनाचा! की हा माझ्याच मनाचा खेळ?

तिने हळूच लिफाफा उघडला आणि ओठावर आलेला हुंदका दाबत ती आतलं पत्र वाचू लागली...

" प्रिये, मी तुला कोणत्या नावाने हाक मारू? इतकी वर्षं झाली या गोष्टीला पण अजूनही ती तितकीच ताजी वाटते मला. तुला मी दिलेली भेट नक्कीच आवडेल. खरं म्हणजे खात्रीच आहे मला. भेटू या लवकरच. आडियोस!"

ती हळूच खुर्चीत बसली हातांचा आधार घेत. मघाची हृदयाची धडधड आता बरीच कमी झाली होती. डोळे उघड्या दाराकडे वळले. मनात आनंद, उत्साह, वेदना, निराशा, राग, लोभ ... सगळ्या भावनांचा एकच कल्लोळ झाला ... तिचं मन मागे धावलं. किती वर्षं झाली बरं या गोष्टीला? तेव्हाही असाच पाऊस कोसळत होता. तिच्या ओठांवर कवितेच्या ओळी आल्या ....

" आल्या आल्या आल्या आल्या सरीवर सरी
कधी लयकारी, कधी भयकरी
कधी कधी मदमस्त अशी अदाकारी
आठवणी ठिबकती सरीच्या रूपाने...."

किती वर्षं झाली त्या गोष्टीला याला काय महत्त्व आहे? भावना महत्त्वाच्या, अनुभव महत्त्वाचा! तिने पुन्हा गुलाबांचा गुच्छ छातीशी घट्ट धरला, एक मोठ्ठा श्वास घेतला आणि

गुणगुणत ठरवलं - पुन्हा एकदा मनाने भूतकाळात जाऊया. मागची सगळी वर्षं पुढच्या तासाभरात जगूया! बघू या तरी या मनाला उभारी मिळते का....

“आदिती,तुझ्या जरा नोट्स  देतेस का केमेस्ट्रीच्या? काल मी बंक केला पिरिअड” आदिती ला रोहितची पहिली भेट आठवली. ना ओळख ना पाळख आणि बिनधास्त मला नावाने हाक मारून नोट्स मागणारा हा कोण म्हणून अदिती ने तिरकी मान करून त्याच्याकडे पाहिले.

“आपण कोण?”

“सॉरी, मी रोहित ”

“मग? मी ओळखते का तुम्हाला?”

“नाही नाही मी तुमच्या घराच्या अगदी जवळ रहातो, म्हणून म्हटले तुमची ओळख करून घ्यावी.”

अदितीने नोटबुक पुढे केले.

“मला उद्या परत पाहिजे ”

“ Thank u,उद्या लगेच देतो परत ”

घाईघाईने रोहित निघून गेला.. आपण आहोजाहो केल्यावर कसा सरळ आला.त्याच्या चेहऱ्यावरचे  गोंधळलेले भाव बघून आदितीला हसायला आले.

दुसऱ्या दिवशी रोहितने वही लगेच परत दिली.

आदिती दिसायला सुरेख होती.उंच सडपातळ बांधा,गोरा रंग,सरळ नाक आणि अतिशय बोलके डोळे. कॉलेज मधल्या बऱ्याच जणांना तिच्या बद्दल आकर्षण वाटत असे पण तिची मिजास अशी होती कि कोणी काही विचारायची हिम्मत केली नव्हती. रूप,पैसा आणि हुशारी यामुळे आदिती चा दबदबा होता.

कॉलेज मध्ये आदितीचा एक छोटासा ग्रूप होता. पिरिअड ऑफ असला कि ते कॅन्टीनमध्ये जाऊन time pass करायचे. प्रक्टिकल नसले कि पिक्चर ठरलेला.एखाद्याला टार्गेट करून त्याची फिरकी घ्यायची अशी नुसती धमाल चालायची.कॉलेज तर्फे कधीतरी केमिकल प्लांट्सना व्हिजीट  असायची तेव्हा तर एखादी पिकनिक असल्यासारखे सगळे उत्साहात असायचे, गाणी ,जोक्स ,नकला अशी खूप मजा यायची. आधी रोहित ग्रूपमध्ये नव्हता पण हळू हळू त्याच्या उमद्या स्वभावामुळे  तो सगळ्यांचा आवडता झाला. ग्रूपमध्ये आदिती ची वट होती कारण तिची गाडी ग्रूपला केव्हाही वापरता येत असे.

घराजवळच राहत असल्यामुळे आदिती आणि रोहितची मैत्री वाढली. कॉलेजला जाताना, अभ्यासाला  ते बरोबर जाऊ लागले.रोहितचा निरागसपणा आणि आदितीचा अवखळ स्वभाव यामुळे त्यांच्यात घट्ट मैत्री जमली.कॉलेजच्या ग्रूपमध्ये कोणाच्या हे लक्षात आले नाही. सर्वांना वाटले कि दोघे जवळ राहतात म्हणून एकत्र असतात.

एकदा असेच कॉलेज लवकर सुटले व सर्वांनी ‘ कभी कभी ’ पिक्चर ला जायचे ठरविले, त्यादिवशी रोहित आला नव्हता आणि आदितीला पिक्चरला जायची इच्छाच होत नव्हती. आदितीला लक्षात आले कि रोहित नसला कि आपल्याला कशातच उत्साह वाटत नाही .मन नुसते सैरभैर होते,कशात लक्ष लागत नाही. रोहितला काय वाटते याचा ती  विचार करू लागली परंतु रोहितने कधीही मैत्रीपलीकडे जाऊन काही भासवले नव्हते.कदाचित असे असेल कि त्याला विचारायची हिम्मत होत नसेल.

कॉलेजमध्ये रुटीन सुरु होते.लेक्चर्स,परीक्षा,टूर्स पण आदितीचे मन कशातच लागत नव्हते. ती सर्वांमध्ये असून नसल्यासारखी असायची. आणि नंतर एकदिवस तो प्रसंग घडला आणि आदितीचे मन प्रेमाच्या  सुंदर भावनेने चिंब चिंब भिजले.

एकदा कॉलेजतर्फे ठाण्याच्या 'कलरकेम' कम्पनीत केमिकल प्लँट्सना व्हिज़िट होती. ती व्हिज़िट आटपून आदिती-रोहितचा सगळा ग्रुप ओहोळ्याला त्याच्या मित्राच्या-मनोजच्या फार्महाऊसवर ट्रीपला गेले. नेहमीसारखीच धम्माल, मस्ती चालली होती. जोक्स, गाणी, नकला, एकमेकांच्या फिरक्या घेणे कशालाही कमतरता नव्हती. ह्या ट्रिपची आधीपासूनच कल्पना असल्यामुळे मनोजनेही आपल्या नोकर माणसांना सांगून जेवणाखाण्याची, सॉफ्ट ड्रिंक्स व इतर सगळ्या गोष्टींची चांगली व्यवस्था केली होती.

चहापाणी आटपून जरा ताजेतवाने झाल्यावर सगळेजण फार्मवर फिरायला निघाले. भरपूर झाडे होती. चिकू व आंब्याच्या बागा होत्या. आंब्याची तीनशे-साडेतीनशे कलमे होती. त्यांना मस्त कैऱ्यांचे घोसच्या घोस लगडले होते.पपईचीही भरपूर झाडे होती. इतरही अनेक प्रकारची झाडे होती. गुलाब, मोगरा, चमेली, चाफा अशी फुलझाडेही फुलांनी डवरली होती. मुले जशीजशी पुढे चालत गेली तशी अजून मोठी मोठी झाडे होती. बकुळीच्या झाडाखाली तर फुलांचा नुसता सडा पडला होता. इतका घमघमाट सुटला होता ना! आजूबाजूचा परिसर त्या वासाने दरवळून गेला होता. मुलींना त्याचं खास आकर्षण वाटलं. त्या ती फुले वेचू लागल्या.

आदितीही ती फुले गोळा करता करता थोडी लांब गेली होती. तिचं आजुबाजूला लक्षच नव्हतं. बकुळीच्या मादक वासाने जणू ती धुंद झाली होती. एवढ्यात झाडीतून एक काळाकुट्ट नाग, कसा कोण जाणे आला ते तिला कळलेच नाही. तिच्यापासून तो 3-4 पावलांवर आला असेल तेवढ्यात रोहितने प्रसंगावधान राखून मागच्या मागे येऊन आदितीला आपल्या दोन हातात वर उचलून घेतले व मागे फिरून घराच्या दिशेने घाईने चालू लागला. हे अगदी एका क्षणात घडून गेले. आदितीला तर कळलेच नाही की काय झाले. याने आपल्याला असे काय उचलले? इतर मुलांची बोलणी कानावर आल्यामुळे मागे वळून जेव्हा पाहिले तेव्हा तिलाही लगबगीने दाट जंगलात जाणारा तो लांबलचक काळाकुट्ट नाग दिसला. आदितीची त्रेधातिरपीट उडाली. प्राण नुसता कंठाशी आला होता. घाबरून दोन्ही हात रोहितच्या भोवती पसरून तिने त्याला करकचून मिठी मारली. तिच्या काळजात नुसतं धडधडत होतं, धडधड थोडी कमी झाल्यावर तिच्या लक्षात आले की आपण रोहितच्या बाहुपाशात आहोत. त्याच्या अंगाची ऊब तिला जाणवली. रोहितने आपले प्राण वाचवलेत हा नुसता विचार मनात येताच तिने त्याच्याभोवतीची तिची सैल झालेली मिठी परत एकदा अधिकच घट्ट केली. आदितीच्या मनात प्रेमाच्या नुसत्या लाटा उचंबळून येत होत्या तितक्यात रोहितने तिला खाली उतरवून ठेवले.

रोहितने आपले मैत्रीचे कर्तव्य पार पडले होते. आदिती ही त्याची खरोखरीच जीवाभावाची मैत्रीण होती. पण तिच्याबद्दल त्याच्या मनात कधीच प्रेमाची भावना नव्हती. ती त्याची प्रेमिका कधीच होऊ शकणार नव्हती.

रोहित हा मध्यम परिस्थितीत वाढलेला, हुशार, हरहुन्नरी, ठरवलेली गोष्ट पुरी करणारा असा होता. त्याचे बालपण म्हणजे तो नऊ वर्षांचा असेपर्यंत एकदम उत्तम गेले होते. रोहितच्या वडिलांचा मुला-मुलींसाठी शाळा आणि वसतिगृह काढण्याचा व्यवसाय होता. त्यांच्या अनेक ठिकाणी अशा चेन्स होत्या. ह्या उद्योगात मुलांच्या सुखसोयी व अभ्यासक्रम शिकवण्याची पद्धत व परिसर याला प्राधान्य दिले जायचे. ह्या उद्योगात त्यांची खूपच चांगली प्रगती होत होती. सगळीकडे त्यांच्या शाळांचा गवगवा होत होता. मुलं त्या शाळेत येण्यासाठी धडपडत होती. पण दुर्दैवाने ह्या उद्योगात त्यांचा जम बसतोय तोच त्यांच्या दोन पार्टनर्सनी मिळून रोहितच्या वडिलांची फसवणूक करून ह्या संपूर्ण उद्योगातून त्यांना बादच केले. हा धक्का सहन न होऊन हार्टअॅटॅकने त्यांना मृत्यु आला. मागे नऊ वर्षांचा रोहित आणि पाच वर्षांची राजी यांची जबाबदारी त्यांच्या आईवर आली.
रोहितची आई धीराची होती. एकदमच होत्याचे नव्हते झाले होते. नाही म्हणायला राहते घर व थोड्याश्या फिक्स डिपॉज़िट्स होत्या. पण वेळप्रसंगी उपयोगी येतील म्हणून त्यांना हात न लावता शाळेत शिक्षिकेची नोकरी, घरी शिकवण्या व भरीला शिवणकाम करून तिने मुलांना मोठे केले, त्यांच्यावर चांगले संस्कार केले. रोहितने आपल्या आईने केलेले कष्ट स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले होते. स्वतःच्या रक्ताचे पाणी करून तिने मुलांना वाढवले होते. मुलांना सुसंगतीत ठेवून कुसंगती व वाईट गोष्टींपासून दूर ठेवले होते.
घरात फक्त तिघेच असल्यामुळे असेल पण त्या तिघांचं एक वेगळेच विश्व होते. त्यांच्यात एक घट्ट नातं होतं. रोहितचा आपल्या आई आणि बहिणीवर अतोनात जीव होता. त्याने ठरवून टाकलं होती की आपणही खूप शिकून, कष्ट कितीही करावे लागले तरी आपल्या कर्तबगारीवर मोठे व्हायचे. यशापर्यंत पोहचण्यासाठी कुठलाही शॉर्टकट नसतो. यशाचा मार्ग अतिशय खडतर असतो आणि त्यावरून चालायची तयारी पाहिजे. कष्ट करून मिळालेल्या यशाची गोडी काही वेगळीच असते. आपल्या आईला खूप प्रेम देऊन तिला सुखी समाधानी ठेवायचे. आईला साजेशी तिला आवडणारी सून आणायची. ती आपल्या आईची मनापासून मुलगीचच झाली पाहिजे. एखादी लेक जशी तिच्या आईवर मनापासून प्रेम करते तसेच प्रेम आपल्या आईला तिच्याकडून मिळाले पाहिजे.

आदिती ही सुंदर, आकर्षक आणि गोड मुलगी असली तरी तिला रूप, पैसा याची मिजास होती. ती खूप श्रीमंत होती पण तिच्या वडिलांच्या पैशावर रोहितला श्रीमंत व्हायचं नव्हतं. एकंदरीतच त्याने ठरवून ठेवलं होतं की आदिती ही आपली फक्त एक चांगली मैत्रीणच होऊ शकते, प्रेयसी नाही.

**कथा क्र. १२_४**

अदितीला रोहितच्या मनातल्या या विचारांची काहीच कल्पना नव्हती. तिने अंतर्मुख होऊन विचार केल्यावर तिच्या लक्षात आले की आपण रोहीतवाचून राहू शकत नाही. ती वाट पाहत होती की तो स्वतःहून प्रपोज करतो काय ? तो तिच्याशी अतिशय प्रेमाने वागत होता, तिची काळजीही घेत होता पण प्रेम या भावनेपासून दूर वाटत होता. त्यामुळे तिला त्याचा अंदाज येईना. तिला असेही वाटले की आता त्याचे लक्ष शिक्षणावर एकाग्र झाले असेल आणि म्हणूनही तो या दृष्टीने विचारच करीत नसेल. पण नंतर तिला अशी काळजी वाटू लागली की आपल्या भावना त्याला कळायच्या आत तो दुसऱ्या कोणाच्या पाशात अडकला तर ? तिच्या घरच्या श्रीमंतीमुळे व तिच्या रुपामुळे अशी निराशा पचविण्याची तिला सवयच नव्हती. जे हवे ते मिळालेच पाहिजे हा तिचा स्वभाव झाला होता. त्यामुळे अशी निराशा नशिबी पदरी येऊच नये या विचाराने शेवटी तिने निश्चय केला की आपणच ही कोंडी फोडायची आणि स्वतःच पुढाकार घेऊन रोहितशी स्पष्ट बोलायचे.

दुसऱ्याच दिवशी रोहितने तिला विचारले कि" जाताना माझ्याबरोबर मार्केटमध्ये येशील का?" त्यावर अदिती म्हणाली "तू सांगशील तेथे येईन मी, तुझ्यासाठी काहीही करीन रे"

"अदिती असे काय बोलतेस?"

"मग काय करू ? तू समजून न समजल्या सारखा वागतोस. मुलीला हे सांगायला किती कठीण जाते,तुला कसे सांगू? तुला माझ्याबद्दल मैत्रीपलीकडे कसल्याच भावना नाहीत का? माझ्या वागण्यातून, नजरेतून तुला काहीच समजत नाही का?" अदिती अगदी डेस्परेट होऊन विचारत होती.

" रोहित मला माहित आहे की तुला आता फक्त अभ्यास महत्वाचा आहे, माझी पण तीच प्रायोरिटी आहे. पण माझे लक्ष त्यात सध्या लागत नाही रे ! आय लव्ह यू रोहित ! मी तुझ्यावर फार प्रेम करते रे."

" अदिती तुझ्या भावनांचा मी खूप आदर करतो. पण तू आणि मी फार वेगळ्या वातावरणात वाढलो आहोत. आपल्या सांपत्तिक स्थितीत खूप अंतर आहे. शिवाय माझ्या आईने केलेले कष्ट मी कधीच विसरू शकत नाही. त्यामुळे तिला अतिशय सुखी ठेवणे हे माझे पहिले ध्येय आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करून मला असे वाटते की मी तुझ्या बऱ्याच अपेक्षा पूर्ण करू शकणार नाही. आज तू भावनांच्या भरात काहीही तडजोड करायला मागे पुढे पाहणार नाहीस. पण नंतर मात्र आपल्यात कुरबुरी सुरु होतील. त्याऐवजी आपल्या केवळ मैत्रीचा हा जिव्हाळाच आपण आयुष्यभर जपू या का ? आईला सुखी ठेवण्यासाठी मी तुझ्यावर अन्याय करू शकणार नाही ".

आदिती या नम्र व हळुवार नकारानेही पार दुखावली गेली. पण ती रोहितला कधीच विसरू शकली नाही.

हळू हळू तिने रोहितशी मैत्रीचे संबंध कमी केले. रोहितला ती विसरण्याचा प्रयत्न करु लागली. त्याला आपण आवडतो ही  एकच गोष्ट तिच्या मनात घर करून राहिली.

डिग्रीनंतर तिने पोस्ट ग्रज्युएशन केले. पी.एच.डी पण मिळवली. एका चांगल्या कॉलेजात ती प्रोफेसर म्हणून काम करू लागली. तिच्या लग्नासाठी इतरांनी केलेले सगळे प्रयत्न वाया गेले. रोहितच्या आठवणींशी ती प्रामाणिक व एकनिष्ठ राहिली. शेजारच्या शमाने घेतलेला आणि अदितीच्या घरात ठेवलेला तो लिफाफा आणि ती लाल मखमली डबी. रोहितही त्या आठवणीं जपत  माझ्यासारखाच अजूनही एकटा राहिला आहे का ? त्याने पत्रावर त्याचा नवीन फोन नंबर दिलेला आहे. काय करावे ? त्याला फोन करावा का ? आज साधारण दहा वर्षानंतर रोहितचा आवाज आपण ऐकणार या कल्पनेने तिला घेरी येऊ लागली.

असेच पावसाळ्याचे दिवस होते जेव्हां तिने रोहितला त्याच्यावरच्या प्रेमाची कबुली दिली होती . आज तिला तो दिवस आठवून पुन्हा एकदा रडू कोसळलं होतं. त्याचा नकार पचवताना तिने जे दुःख अनुभवलं होत ते तिने कोणाच जवळ व्यक्त केलं नव्हतं . हृदयात आलेल्या असंख्य कळा तिने तिथल्या तिथेच दाबून टाकल्या होत्या. रोहित वर असलेल प्रेम मनातल्या मनातच ठेवून तिने PH .d पूर्ण केलं होत . त्या गोष्टीलाही आता जवळ पास दहा वर्ष झाली होती . त्यावेळीही असाच एक पुष्प गुच्छ , congratulations चे कार्ड आणि सोन्याच एक छोटस पदक असलेली लाल रंगाची मखमली डबी घेऊन एक मुलगा आला होता . रोहित साहेबांनी दिलाय असं सांगून , तिने काही विचारायच्या आतच  तो धड धड जिना उतरून निघून हि गेला होता . तेव्हां हि ती अशीच गोंधळली होती . एकाएकी आलेल्या त्या भेटीने ती खुश पण झाली होती आणि विचलित हि झाली होती. रोहितचा लग्न झालं असेल का ? त्या कार्ड वर वा डबीवर ना  कुठला contact no होता ना कुठला पत्ता .  तिच्या खुपदा मनात आलं, त्याच्या घरी जाऊन बघावं का ? त्याला विचारावा का कि हे असं अचानक मैत्रिणीची आठवण कशी काय झाली , कि आता नव्याने प्रेम निर्माण झालंय. खुप विचार करून तिने तो विषय शेवटी  तिथेच थांबवला  . तिचं लग्नाच वय असल्याने घरचे , ओळखीचे, नातेवाईक  सगळेच आपापल्या परीने तिच्यासाठी वर संशोधन करत होते पण तिला काही कोणी पसंत पडत नव्हता .रोहित पुढे नवरा म्हणून दुसर्या कोणाचा हि विचार करणे तिला शक्य नव्हते. बघता बघता तिचं लग्नाचं वय सरत गेलं आणि एक दिवस तिने आपला लग्नच न करण्याचा निर्णय सर्वांना सांगितला होता.

आई बाबा खूप चिडले , वैतागले , त्याने तिला समजावण्याचा खूप प्रयत्न केला पण ती काही तिच्या निश्चयापासून हटेना . तिला एका उत्तम कॉलेज मध्ये lecturer चा job मिळला होता . आई वडिलांशी लग्न ह्या विषयावर वारंवार खटके उडायला लागल्यावर तिने ते घर सोडून दिले आणि स्वतःचा छोटा flat घेतला .ती आता तिथे राहू लागली .

त्या pendant ची डबी तिच्या कपाटात आजही तशीच होती आणि ४-५ दिवसातून एकदा तरी ती बघितल्या शिवाय तिला चैन पडत नसे  .

आज दहा वर्षांनी पुन्हा एकदा तसाच पुष्प गुच्छ आणि गिफ्ट तिला मिळालं होत . ती आनंदात हि होती आणि थोडीशी विचारात हि होती . हा आपल्याला अजून विसरला नाही तर .पण आपला हा पत्ता कोणी दिला ह्याला ? तिच्या मनात विचार आला . त्या कार्ड वर चक्क contact no हि होता ह्यावेळेस .त्याच्याशी बोलण्याची इच्छा एकदम अनावर झाल्याने तिने सकाळीच  त्याला  फोन करायचं ठरवलं. शनिवार असल्याने तिला lecture नव्हते .धडधडत्या छातीने तिने त्याला फोन लावला .तब्बल दहा वर्षांनंतर् ती त्याच्याशी बोलत होती . पलीकडून रोहितचा आवाज ऐकताच तिच्या काळजाचा ठोकाच चुकला जणू . "अदिती संध्याकाळी r mall ला भेटूयात ..कॉफी shop मध्ये ?"त्याच्या त्या बोलण्याने ती परत एकदा भूतकाळात पोहोचली आणि "हो कुठेही येईन रे तुझ्याबरोबर " असंहि पटकन म्हणून गेली .भानावर येताच तिने वेळ नसल्याचा बहाणा केला पण रोहितने खूपच आग्रह केल्याने तिला त्याचे मन मोडावले नाही . cotton चा फिकट गुलाबी पंजाबी ड्रेस घालून ती रोजच्या सारखी आजही छानच दिसत

होती . ठीक पाच वाजता ती कॉफी shop मध्ये पोहोचली .उंच पुरा रोहित अजूनही तसाच पूर्वीसारखा देखणा दिसत होता. पण हे काय हि चिमुरडी कोण ह्याच्याबरोबर ?तिला कळेना .ती जवळ येताच रोहित ने रीयुला ओळख करून दिली "रियू हि अदिती मावशी ,my friend". त्या अचानक झालेल्या ओळख समारंभाने अदिती पूर्ण गांगरून गेली होती . "अदिती , हि, रियू माझी मुलगी " म्हणत तो हसला. खूपच गोड होती ती मुलगी . "baba तुझी freind किती मस्त आहे " रियू म्हणाली. तितक्यात बाजूलाच असलेल्या सविता बाईंना रोहित ने खुण करून रीयुला मागच्या प्ले झोन मध्ये घेऊन जाण्यास सांगितलं. त्या हि अदिती कडे एक तिरपा कटाक्ष टाकत निघून गेल्या."bye मावशी " म्हणत रियू हि गेली .अदितीच्या चेहेर्यावरचे प्रश्न अपेक्षित असल्यासारखेच रोहित ने बोलायला सुरवात केली..समोर असलेला कॉफी मग हातात घेत तो बोलू लागला "अदिती तुला वाटत असेल ना हा असा अचानक कसा आला .८ वर्षांपूर्वी माझा लग्न झाला श्रद्धाशी . खूप साधी पण हुशार आणि लाघवी होती श्रद्धा ." होती ? अदितीच्या मनात विचार आला . "हो..होती . रियू २ वर्षांची असताना श्रद्धाला blood cancer detect झाला . केमो झाल्या , अनेक उपचार , अनेक डॉक्टर्स सगळं काही झालं पण श्रद्धा झुंज नाही देऊ शकली त्या रोगाशी आणि २ वर्ष्यांच्या उपचारा नंतर ती हे जग, रीयुला आणि मला कायमची सोडून निघून गेली .त्याला हि आता एक वर्ष होईल .रियू फक्त चार वर्षांची होती तेव्हां .श्रद्धाच्या मृत्यूने आई हि खचली पूर्ण . आता आजारी आजारी असते सारखी .रीयुला सांभाळायला मग सविता बाईंना ठेवलं .अदिती मागच्याच वर्षी मला एका मित्राच्या बहिणी कडून कळले कि तू lecturer आहेस . तू एकटी राहतेस हेही तुझ्या students ना माहितेय वाटतं.तिच्याच कडून तुझा पत्ता मिळाला . तेव्हां पासून तुला भेटायचे खूप मनात होते पण हिम्मत होत नव्हती . पण शेवटी न राहवून मी तुला गुच्छ पाठवला . " अदितीला खुप वाईट वाटले कि आता रोहित एकटा आहे म्हणून त्याला माझी आठवण झाली का ? ती जास्त काही बोलली नाही . कॉफी संपली तशी दोघं निघाली . दोन दिवसांनी तिला रीयुचा फोन आला " मावशी माझा sunday ला बर्थडे आहे . माझ्याबरोबर ड्रेस आणायला येशील बर्थडे चा? ." रियू तिच्या आई सारखीच गोड होती , लाघवी होती . तिला तिचा आग्रह मोडवला नाही . ती रीयुला घेऊन shopping la गेली आणि दोघींनी खूप मज्जा केली . मग एक दिवस college मधून येताना ती रीयुला घरी घेऊन आली ,तिच्या आवडीचे डोसे केले आणि ice cream खाऊ घालून घरी सोडले . रीयुच्या कंपनीत तिचा वेळ मस्त जात होता . तसंच रियू ला हि ती खूप आवडत होती . अचानक एका संध्याकाळी रोहितचा फोन आला . तो विचारात होता तिला कॉफी शोप मध्ये भेटण्या बद्दल. ती भेटायला गेली त्याला संध्याकाळी ."अदिती रियू खूप दिवसांपासून मागे लागली आहे बाबा आई आण ना परत , मला माहित नाही तूला आवडेल कि नाही पण तरीही विचारतो .माझ्याशी लग्न करशील ? माझ्या रियू ची आई होशील का ?" अदिती हे ऐकून स्थब्ध झाली . ह्या प्रश्नाची ती खरतर मनापासून वाट बघत होती . रोहितला विसरू न शकल्यानेच खरं तर तिने अविवाहित राहण्याचा निर्णय घेतला होता .पण कुठेतरी तिचा स्वाभिमान हि थोडासा दुखावला होता .श्रद्धा नाही म्हणून त्याच्या मुलीची आई होण्यासाठी ह्याने आपल्याला लग्नाबद्दल विचारले ह्याचे तिला वाईटच वाटले . " अदिती माफ कर मला , आपण ज्या व्यक्ती वर मनापासून प्रेम करतो ती व्यक्ती आपल्या आयुष्यातून निघून गेल्यावर काय अवस्था होते ते पुरेपूर

अनुभवलंय मी . माझ्या तुझ्या प्रतीच्या भावना तेव्हां जरी प्रेयसीच्या नसल्या तरी आज मला तू हवी आहेस माझ्या आयुष्यात माझी सहचारिणी म्हणून . तू जितकं मला ओळखतेस , आपलं जितकं tuning असायचं एकमेकांशी तस tuning मी श्रद्धाशी हि नाही करू शकलो हे मला लग्न झाल्यावर खूप जाणवायला लागलं होत. प्रत्येक वेळेला आत्ता अदिती असती तर अश्या तुलना मी करत होतो नकळत . आपला पार्टनर नुसता चांगला असून चालत नाही , त्याच्याशी ते धागे दोरे आतून बांधले गेले पाहिजेत हे पटलय मला . म्हणूनच थोडा निर्लज्ज होऊनच विचारतोय माझ्याशी लग्न करशील ?" अदितीचा डोकं पूर्ण बधिर झाला होत एव्हाना . " तिने रोहितकडे एक दिवसाचा वेळ मागितला .रात्रभर विचार केला .रोहित तिला अजूनही आवडत होता . पण त्याही पेक्षा तिची तार जुळली होती ती लाघवी रीयुशी . रोहितशी लग्न करून ती छोट्या रीयुला हि खुश करणार होती . तिला आई देणार होती . रीयुच आयुष्य त्यामुळे बदलणार होत . ते आईविना पोर तिला दिसू लागल आणि तिने निर्णय घेतला . दुसर्या दिवशी तिने रोहित ला फोन केला .." रोहित मी रीयुची आई व्हायला तयार आहे , तुझं लग्नाच प्रोपोसल असत फक्त तर कदाचित मी नाही म्हटलं असतं पण रीयुची आई व्हायचं प्रोपोसल मी नाकारू शकत नाही " रोहितला जाणवत होत आपल्याला वाटलं होत तितकी मिजासी किंवा श्रीमंतीने माजलेली नाहीये अदिती. कदाचित तेव्हां तिच्याशी लग्न केलं असतं तरी असाच समजूतदारपणा दाखवला असता तिने . चुकलो का आपण तिला ओळखण्यात .

असो पण आता रोहित खुश होता , त्याला खूप बरं वाटत होतं .त्याने अदितीचे मनातल्या मनात खूप खुप आभार मानले .रीयुला त्या वर्षी तिच्या बर्थडे च सगळ्यात मोठ्ठ गिफ्ट मिळाल होत , तिची आई ."